बुलेटप्रुफ वाहन वापरण्यास परवानगी देण्यात आलेल्या मा. मंत्री /राजकीय पदाधिकारी/उमेदवार यांच्याकडून बुलेटप्रुफ वाहनावर झालेला खर्च वसुल करणेबाबत.

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. २३ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९/५/२०१६

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने दि. २९/१२/२०११ रोजी जारी केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आचारसंहितेबाबतच्या एकत्रित आदेशाबाबतच्या पुस्तिकेमध्ये असलेल्या प्रश्नावलीतील प्रश्न क्र. ५४ च्या उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, ज्यांना सुरक्षा दिलेली आहे अशा व्यक्तींच्या संबंधात, विशिष्ट व्यक्तींसाठी, जेथे गुप्तवार्ता प्राधिकाऱ्यांसह सुरक्षा अभिकरणास अशा वापरासाठी विहित करण्यात आले आहे, अशा सर्व प्रकरणामध्ये, राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रुफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल. सुरक्षा अभिकरणांनी तसे विनिदेशपूर्वक विहित केले असल्याखेरीज, राखीव असणाऱ्या अनेक मोटारगाड्यांच्या वापरास परवानगी देण्यात येणार नाही. जेथे अशा बुलेटप्रुफ वाहनांचा वापर विनिर्दिष्ट केलेला असेल तेथे अशी बुलेटप्रुफ वाहने चालविण्याचा खर्च त्या विशिष्ट व्यक्तीलाच सोसावा लागेल.

D:\Mahale DS\Gen\वाहन वापराबाबत १.docx

राज्य निवडणूक आयोगाच्या उपरोक्त सूचनांचा फेरविचार करण्यात आला. फेरविचाराअंती असे आदेशित करण्यात येत आहे की, ज्या व्यक्तींना झेड प्लस (Z+) सुरक्षा पुरविण्यात आलेली आहे. अशा व्यक्तींना आचारसंहितेच्या कालावधीत बुलेटप्रुफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी देण्यात येईल. मात्र बुलेटप्रुफ वाहनाचा वापर अशासकीय कारणासाठी करण्यात आल्यास सदर वाहन वापरावरील खर्च त्या विशिष्ट व्यक्तीला सोसावा लागेल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य / अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा / नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
कार्यासन ०५, निवड नस्ती.